# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com


**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २७.०१.२०२३**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (२१.०१.२०२३ ते २७.०१.२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२८.०१.२०२३ ते ०१.०२.२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३२ | ३२ | ३१ | ३१ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १८ | १७ | १७ | १८ | १९ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | २ | ० | १ | २ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८६ | ८४ | ८८ | ७६ | ७९ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३९ | ३२ | ३३ | ४२ | ४३ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १० | ११ | ९ | १३ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | १६७ | १६७ | १५८ | १५८ | ८१ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा दिनांक २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३१.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १७ ते १९ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ७६ ते ८८ तर दुपारची सापेक्ष आद्रता ३२ ते ४३% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०९ ते १३ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ शेतकरी बंधूनी कार्यक्षम जलसिंचन व्यवस्थापणासाठी पिकाच्या अवस्थेनुसार, जमिनीच्या प्रकाराप्रमाणे शेतामधील विविध पिकांच्या पाण्याची गरज व सिंचन संच चालू ठेवण्याचा कालावधी ई. महत्वपूर्ण माहिती आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " फुले इरिगेशन शेड्यूलर (PIS)" हे अॅप डाउनलोड करून वापरावे.<br>➢ फळबागेतील तापमान नियंत्रित राहण्यासाठी फळबागांना शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. |
| संदेश | | गहू पिक पेरणीस ७० दिवस झाले असल्यास पिकावर १९:१९:१९ या विद्राव्य खताची २०० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | फुलोरा ते दाणे भरणे | ➢ गहू पिकावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम २५ डब्लूजी ५० ग्रॅम प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ अंशत: ढगाळ हवामान असल्याने गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे, प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक प्रती हेक्टरी १.५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्वता | ➢ पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे. |
| ऊस | लागवड | ➢ सुरु उस लागवड १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण केल्यास उस उत्पादकता व साखरेचा उतारा चांगला मिळतो. आडसाली उस लागवडीसाठी को. ८६०३२ (नीरा) किंवा को.एम.०२६५ (फुले २६५) या जातींची निवड करावी. एक डोळा रोपांपासून (३० ते ४५ दिवस वयाच्या रोपांची ) ऊस लागवड करावी त्यामुळे नेहमीच्या तुलनेत ऊस लागणीस ३० ते ४५ दिवसांपर्यंत जोपासण्यासाठी लागणारे पाणी, तण नियंत्रण, खते,देखरेख यांची बचत होते. बेण्यादवारे लागवड करावयाची असल्यास बेणे मळ्यात वाढवलेले ९ ते १० महिने वयाचे निरोगी, रसरशीत आणि अनुवांशिक दृष्ट्या शुद्ध ऊस बेणे वापरावे. |
| आले | पक्वता | ➢ बाजारातील मागणीप्रमाणे पक्व आल्याची काढणी करावी. काढणीनंतर आल्याचे कंद स्वच्छ धुवून मातीपासून वेगळे करावे आणि बाजारात पाठवावे. |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **वांगी** | फुलोरा ते फळधारणा | ➢ वांगी पिकावर कोळी आढळल्यास फेनप्रोपॅथ्रीन ३० %ई.सी. ५ मिली किंवा डायकोफॉल १८.५%ई.सी. २५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **स्ट्रॉबेरी** | वाढीची | ➢ लागवडीनंतर साधारणत: ८५ ते ९० दिवसांनी स्ट्रॉबेरी फळांची जातींच्या पक्वतेनुसार काढणी १ दिवसाआड करावी. साठवणुकीसाठी प्रिकुलिंग व कोल्डस्टोरेज तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रिकुलिंग मध्ये स्ट्रॉबेरी फळे ० ते ४ अंशसेल्सिअस तापमानात ४ तास थंड केली जातात त्यामुळे फळांचे आयुष्मान दुप्पटीने वाढते. |
| **भेंडी** | फुलोरा ते फळधारणा | ➢ भेंडी पिकावरील फळे पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन२.८ % ८ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ % ई.सी.६ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.<br>➢ कीड नियंत्रणासाठी १० ट्रायकोकार्ड १० प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. |
| **पशुधन** | वाढीची | ➢ थंडीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आहारात पुरेसे प्रथिने आणि खनिजे द्या. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २४.०१.२०२३

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**